**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी**
**बांधकाम विभाग**

**प्रस्तावना** :-

**विषय :- भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका हद्दीतील मनपा शाळा क्रं.५६ नागावच्या बाजुला असलेली जुनी व्यायामशाळा दुरुस्ती करणे.(महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान जिल्हास्तर योजने अंतर्गत.२०२३-२४)**

मा.श्री.शंभुराजे देसाई, पालकमंत्री, ठाणे तथा मंत्री, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य यांनी भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,करीता "महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान जिल्हास्तर"या योजनेअंतर्गत निधी बाबत पत्रान्वये मागणी केली आहे. त्या अनुषंगाने विषयांकीत काम "महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान जिल्हास्तर"या योजने अंतर्गत प्रस्तावित करणेबाबत महाराष्ट्र शासन जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे यांचेकडील पत्र,जा.क्रं.नगरोत्थान/का.४/२०२३/२४/३७१९ दिनांक-२२/१२/२०२३ च्या पत्रान्वये कळविणेत आले आहे. सदरचे काम संदर्भिय पत्रामधील विवरणपत्रात क्रं. ०१ वर असुन सदर कामाचे अंदाजपत्रक सादर करणे अपेक्षित आहे. सदर योजनेअंतर्गत जिल्हा नियोजन समितीचा ७०% हिस्सा व महानगरपालिकेचा ३०% हिस्सा राहणार आहे. विषयांकीत ठिकाणी पहाणी केली असुन भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका हद्दीतील मनपा शाळा क्रं.५६ नागावच्या बाजुला असलेली जुनी व्यायामशाळा दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

विषयांकीत कामी रक्कम रु.४९,९९,१४४/- (अक्षरी रु.एकोनपन्नास लाख नव्यांनव्वद हजार एकशे चवरेचाळीस रु.) मात्र खर्चाचा प्रस्ताव सादर केला असता त्यास मा.आयुक्त यांनी दि.१६/०२/२०२४ रोजी मंजुरी दिली आहे. तरी सदरचा प्रस्ताव प्रशासकीय मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रं.** ४०५ **दिनांक** :-२८/०८ /२०२४

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका हद्दीतील मनपा शाळा क्रं.५६ नागावच्या बाजुला असलेली जुनी व्यायामशाळा दुरुस्ती करणे याकामी रक्कम रुपये रु.४९,९९,१४४/- (अक्षरी रु.एकोनपन्नास लाख नव्यांनव्वद हजार एकशे चवरेचाळीस रु.) मात्र खर्चाचा प्रस्ताव मंजुरीस सादर केला आहे. त्यास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२) नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ (१अ) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, रु.४९,९९,१४४/- (अक्षरी रु.एकोनपन्नास लाख नव्यांनव्वद हजार एकशे चवरेचाळीस रु.) मात्र खर्चाच्या प्रस्तावास प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**

**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी**
**बांधकाम विभाग**

**प्रस्तावना :-**

**विषय :- भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका हद्दीतील मनपा शाळा क्रं.५६ नागावच्या बाजुला असलेली जुनी व्यायामशाळा दुरुस्ती करणे.(महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान जिल्हास्तर योजने अंतर्गत.२०२३-२४)**

उपरोक्त विषयांकित कामी अंदाजपत्रकीय रक्कम रु. ४९,९९,१४४/- करिता ई-निविदा सुचना क्र.०६/२०२४-२५, टेंडर नं.१०५३९५१ दिनांक १६/०७/२०२४ ते २३/०७/२०२४ रोजी दु .४.०० वाजे पर्यंत बी-१ पध्दतीची ई निविदा मागविण्यात आली आहे. दि.३१/०७/२०२४ रोजी लिफाफा १ तांत्रिक बीड उघडण्यात आली असुन या कामी ३ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. निविदा छाननी अंती मे.सागर कंन्स्ट्रक्शन, यांचे कागदपत्र अपुर्ण असल्याने त्यांची निविदा अपात्र ठरविण्यात आली आहे. लिफाफा २ फायनानशियल बीड दिनांक ०५/०८/२०२४ रोजी दु. ६.२१ मि.उघडण्यात आली असून एकूण पात्र २ निविदांचा तौलनिक दर तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदाकाराचे नांव | निविदेतिल दर (टक्केवारी) | निविदेतील दराची रक्कम |
|---|---|---|---|
| **१** | **मे.आर.के.कंन्स्ट्रक्शन,भिवंडी** | **अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.०० टक्के कमी दराने** | **४८,४९,१६९.५४३** |
| २ | मे.हिंदुस्तान इंटरप्रायझेस,भिवंडी | अंदाजपत्रकीय दराने | ४९,९९,१४३.८५ |

वरील पैकी मे.आर.के.कंन्स्ट्रक्शन,भिवंडी यांची निविदा सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.०० टक्के कमी दराने रक्कम रुपये ४८,४९,१६९/- (रुपये अठेचाळीस लाख एकोनपन्नास हजार एकशे एकोनसत्तर) च्या खर्चाची निविदा संविदा करणे कामाच्या प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करणे कामी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रं.** ४९६ **दिनांक :-**२८/०८/**२०२४**

मे.आर.के.कंन्स्ट्रक्शन,भिवंडी यांची निविदा सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.०० टक्के कमी दराने रक्कम रुपये ४८,४९,१६९/- (रुपये अठेचाळीस लाख एकोनपन्नास हजार एकशे एकोनसत्तर) च्या खर्चाची निविदा मंजुरीस शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२) नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ (१अ) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका हद्दीतील मनपा शाळा क्रं.५६ नागावच्या बाजुला असलेली जुनी व्यायामशाळा दुरुस्ती करणे याकामी सर्वात कमी दराचे निविदाकार मे.आर.के.कंन्स्ट्रक्शन,भिवंडी,यांचे समवेत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करण्यास मंजुरी देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिक**